

# कंपोस्ट खत कशासाठी?

SWACH
A higher level of self-reliance

- कंपोस्ट ही एक नैसगिक व कमी खर्चिक प्रक्रिया असून ती तुमच्या स्वयंपाक घर व बागेतील कचऱ्याचे रुपांतर बागेसाठी आवश्यक अशा खतामध्ये करते.
- पुणे महानगरपालिकेच्या कायद्यानुसार २००० सालानंतर स्थापन झालेल्या प्रत्येक सोसायटीमध्ये विघटनशील कचऱ्यावरील कंपोर्स्टींगची प्रक्रिया करणे बंधनकारक आहे.
- आपल्या घराला पर्यावरणपूरक अशी मान्यता मिळवण्याचा व मालमत्ता करावर ५ टक्के सूट मिळविण्याचा कंपोस्ट हा एक मार्ग आहे.
- कंपोस्ट पर्यावरणास मदत करते कारण या प्रक्रियेत स्वयंपाक घरातील कचरा कचरा डेपो मध्ये नेला जातो, तेथे हवा न मिळाल्यामुळे तो कचरा सडण्याची प्रक्रिया सुरु होते. या प्रक्रियेतून कार्बन डायॉक्साईड पेक्षाही २० पटीने हानीकारक असा मिथेन हा हरित गृह वायू निर्माण होतो. परंतु कंपोस्टमुळे ही प्रक्रिया घडत नाही.
- प्राथमिक गुंतवणुक वगळता कंपोस्ट खत तयार करण्यासाठी येणारा खर्च हा नगण्य आहे. जर तुमच्याकडे बाग असेल तर तयार झालेले हे कंपोस्ट खत रासायनिक खतांवर होणारा खर्च वाचवू शकते.
- कचऱ्याचे विभाजन करणे ही कंपोस्ट खत प्रक्रियेची पहिली पायरी आहे.
- स्वच्छ तुमच्या दारातून कोरडा कचरा गोळा करुन नेते.
- तुमच्या घरी किंवा सोसायटीमध्ये तुम्ही ओल्या कचऱ्याचे सहजरीत्या कंपोस्ट खत तयार करु शकता.

- थोड्या किंमतीमध्ये प्रशिक्षित कचरा वेचक येऊन आपल्या कचऱ्याचे नियोजन करील.
- पर्यवेक्षकही येऊन ही प्रक्रिया सुरळीत चालू आहे याची खात्री करेल.
- कंपोस्ट खतामुळे माश्या व उंदीर, घूस यांसारखे प्राणी येतात अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.फक्त चुकीच्या कंपोस्ट प्रक्रियेमुळे घाण वास किंवा प्राणी व कीटक येतात.
- चालू कंपोस्ट खत प्रक्रियेतील अडचणींकरिता देखील तुम्ही आम्हाला संपर्क करु शकता.

**तुमच्या घरी, सोसायटीत, शाळेत, ऑफिसमध्ये तुम्हाला कंपोस्ट युनिट हवे असल्यास स्वच्छ ला संपर्क साधा.**

सॉलिड वेस्ट कलेक्शन अँड हँडलिंग अर्थात स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित, पुणे.स्वच्छ को.ऑप. ही भारतातील पहिली स्वयंरोजगारित कचरा वेचकांच्या मालकीची सहकारी संस्था आहे.ही स्वायत्त संस्था पुणेरी नागरिकांना कचरा नियोजनाच्या प्राथमिक सेवा पुरविते. घरोघरी जाऊन कचरा वेचणे व संबंधित कचरा नियोजन सेवा पुरविण्यासाठी स्वच्ड ही पुणे महानगर पालिका अधिकृत संस्था आहे.

**स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित** ही स्वयंरोजगार करणाऱ्या कचरा वेचकांची स्वायत्त संस्था आहे.
पुणे महानगरपालिकेने त्यांना घरोघरीचा कचरा गोळा करणचे आणि त्याचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार दिले आहेत.

**कोथरुड कचरा डेपो, पौड रस्ता, कोथरुड, पुणे ४११ ०३८** ✿ **दु.: ०२० ६५०००८१७** ✿ **स्वच्छ हेल्पलाईन : ९७६५९९९५००** ✿ **ई-मेल :** swachcoop@gmail.com ✿ **वेबसाईट :** www.swachcoop.com